

आज व उद्या तिसरी माळ
चंद्रघंटा देवी

वर्ष - 9 । अंक -33 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | । बुधवार, दि. 24 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


**आतील पानांत**


- भारत-पाकिस्तानमध्ये फायनल?
- पाकिस्तानचा सुपर फोरमध्ये मोठा विजय
- 'एच-१बी' शुल्कवाढीचा परिणाम!
- कोलकात्यामध्ये जनजीवन विस्कळीत



**राज्यात पूरस्थिती** ओला दुष्काळ जाहीर करण्याची विरोधी पक्षाची वारंवार मागणी

# आभाळ फाटलं, मदत जाहीर!

## शेतकऱ्यांसाठी आनंदवार्ता; पीक नुकसानीसाठी 2,215 कोटींची मदत जाहीर

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**महाराष्ट्रात अतिवृष्टीने 70 लाख एकरवरील पीक हातचं गेलं आहे. तर अनेक गावात पूरस्थिती आहे. शाळा, घराचं मोठं नुकसान झालं आहे. पीक नुकसानीसाठी 2,215 कोटींची मदत जाहीर झाली आहे. पीक नुकसानीसाठी मदत म्हणून 31.64 लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम जमा होईल. मदत व पूनर्वसन विभागाने याविषयीचा शासन निर्णय जाहीर केला. खरीप 2025 साठी ही मदत जाहीर करण्यात आली आहे.**



2,215 कोटींच्या मदतीला मंजूरी राज्यात विदर्भ, मराठवाड्यात पावसाने हाहाकार घातला आहे. पश्चिम आणि उत्तर महाराष्ट्रातील अनेक गावांना पावसाने तडाखा दिला आहे. त्याचा आढावा सरकार सातत्याने घेत होतं. यापूर्वी विदर्भात पावसाने धुमाकूळ घातला. तर आता विदर्भासह मराठवाड्याला पावसाने झोडपून काढले आहे. यापूर्वीच्या नुकसानीचे आणि आताचे पंचनामे हे युद्धपातळीवर करण्यात येत आहे. आतापर्यंत जी आकडेवारी प्राप्त झाली आहे. त्यानुसार 32 लाख शेतकऱ्यांचं मोठं नुकसान राज्यात झाले आहे.





त्यासाठी 2,215 कोटींच्या मदतीला मंजूरी देण्यात आली आहे. हा निधी आजच शेतकऱ्यांच्या खात्यात वळता करता येईल. यामध्ये विदर्भातील काही जिल्ह्यांचा आणि मराठवाड्यातील धाराशिवसह नांदेड आणि बीडमध्ये मुसळधार पावसाने नुकसान झालेल्या पट्ट्याचा समावेश आहे. तर आता पावसामुळे जे नुकसान झाले आहे. त्याचा आढावा सुद्धा घेतला जात आहे. ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी वारंवार विरोधी पक्ष करत आहेत. तर विदर्भ आणि मराठवाड्यातील नुकसानग्रस्त गावांची, जिल्ह्यांची विभागवार आकडेवारी तयार करण्यात आली आहे. युद्धपातळीवर ही मदत आता नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात येत आहे. अनेक भागात अद्यापही पाणी आहे, त्यामुळे तिथे पंचनामे झालेले नाहीत. पाणी ओसरल्यावर याठिकाणचे पंचनामे करण्याचे कामही करण्यात येणार आहे.

**1,339 कोटींची मदत जाहीर**

दरम्यान सरकारकडून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी मोठी मदत जाहीर करण्यात आली आहे. जून 2025 ते ऑगस्ट 2025 या दरम्यान नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत जाहीर करण्यात आली आहे. नुकसानग्रस्तांना राज्य सरकार 1 हाजर 339 कोटींची मदत देणार आहे. अतिवृष्टी झालेल्या शेतकऱ्यांसाठी ही मदत जाहीर करण्यात आली आहे. जून ते ऑगस्ट 2025 या काळात जे पंचनामे केले, त्याआधारे ही मदतीची घोषणा करण्यात आली आहे. तर बीड, धाराशिवसह काही जिल्ह्यात रेस्क्यू ऑपरेशन सुरु आहेत. हेलिकॉप्टरच्या मदतीने पूरात अडकलेल्या गावातील नागरिकांची सुटका करण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

**राज्यात पूरस्थिती, मंत्र्यांनाही दिले**

## गेवराई तालुक्यात सिंदफना नदीला पूर, NDRF चे बचाव कार्य

गेवराई तालुक्यातही सिंदफना नदीला आलेल्या पुरामुळे परिस्थिती बिकट झाली आहे. नांदुर हवेलीकडे जाणाऱ्या रस्त्यावर पाणी साचल्याने या भागातील संपर्क तुटला आहे. पुराच्या पाण्यात 36 लोक अडकल्याची माहिती मिळाल्यानंतर NDRF ची टीम घटनास्थळी पोहोचली. रात्री उशिरापर्यंत चाललेल्या बचाव कार्यात 18 लोकांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. त्यानंतर रात्री उशिरा पाण्याची पातळी कमी झाल्यानंतर उर्वरित लोकांनाही सुरक्षित बाहेर काढले. या पुरामुळे या परिसरातील शेती पाण्याखाली गेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. सध्या NDRF ची एक तुकडी गेवराईत तळ ठोकून असून, संभाव्य धोक्यावर लक्ष ठेवून आहे. बीड जिल्ह्यातील तिन्ही नद्यांना पूर आल्याने अनेक ठिकाणी बचाव कार्य सुरु आहे. यामुळे जिल्हा प्रशासन नागरिकांना सुरक्षित राहण्याचे आवाहन करत आहे.

रस्त्यांचा दोषदायित्व कालावधी

## रस्त्यांचा ‘दोषदायित्व’ कालावधी संपुष्टात

# ठेकेदारांची रस्त्यांच्या देखभालीपासून मुक्ती

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सुमारे ३०० कोटी रुपये खर्चून १०० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचा दोषदायित्व कालावधी महापालिकेनेच रस्ते खोदाईला मंजुरी दिल्यामुळे संपुष्टात आला आहे. यामुळे या रस्त्यांच्या देखभालीची जबाबदारी ठेकेदाराकडून आता महापालिकेवर आली आहे. या कारभाराचे ‘दोषदायित्व’ कुणाचे, हा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे.**

### या कारभाराचे ‘दोषदायित्व’ कुणाचे




शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजवून महापालिकेच्या पथ विभागाने २०२३ मध्ये सुमारे ३०० कोटी रुपये खर्च करून शहराच्या विविध भागांत १०० किलोमीटरचे रस्ते तयार केले होते. या रस्त्यांसाठी पाच वर्षे ‘दोषदायित्व’(डिफेक्ट लायबिलिटी पिरिअड-डीएलपी) कालावधी होता. मात्र, रस्त्यांवर पालिकेच्या पाणीपुरवठा, ड्रेनेज विभागांसह राज्य सरकारच्या विभागांनी खोदाई केली आहे. पालिकेच्या पथ विभागाने या रस्त्यांवर खोदाई करण्यासाठी परवानगी दिल्यामुळे या रस्त्याचा दोषदायित्व कालावधी संपुष्टात आल्याची माहिती समोर आली आहे.महापालिकेने २०२३ मध्ये पाच पॅकेज तयार करून सुमारे ३०० कोटी रुपयांचे रस्ते तयार करून घेतले. मात्र, महापालिकेने विविध कामांसाठी हे रस्ते खोदाई करण्याची परवानगी दिल्याने पाच वर्षे या रस्त्यांची देखभाल-दुरुस्तीच्या कामातून संबंधित ठेकेदाराची सुटका झाली असून, आता त्यांची देखभाल-दुरुस्ती करण्याची जबाबदारी महापालिकेवर आली आहे.दोन वर्षांपूर्वी महापालिकेच्या पथ विभागाने १००.७८ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे केली. यासाठी सुमारे ३०० कोटी रुपये खर्च करण्यात आले. या रस्त्यांच्या निविदांमध्ये ज्या रस्त्यावर खोदाई होणार नाही. त्या रस्त्याचा दोषदायित्व कालावधी पाच वर्षे ठेवण्यात आला होता. मात्र, गेल्या दोन वर्षांत या रस्त्यांवर पालिकेच्या पाणीपुरवठा, ड्रेनेजेसह महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळासह एमएनजीएल, बीएसएनएल, ओएफसी शासकीय व इतर खासगी कंपन्यांकडून विविध कामांसाठी खोदाईसाठी परवानगी मागितली. पालिकेच्या पथ विभागाने रस्तेखोदाईसाठी परवानगी दिली आहे. त्यानंतर या रस्त्यावर पॅचवर्कचे काम करण्यात आले होते; पण हे पॅचवर्क रस्त्यांशी एकरूप झाले नाही. महापालिकेने या रस्त्यांवर खोदाई करण्यासाठी मान्यता दिल्याने त्यांचा दोषदायित्व कालावधी संपुष्टात आला आहे. त्यातच आता ‘पुणे ग्रॅण्ड चॅलेंज २०२६’ या सायकल स्पर्धेसाठी १४५ कोटी रुपये खर्च करून रस्ते तयार केले जाणार आहेत. या रस्त्याच्या कामांसाठी महापालिकेने दहा वर्षांचा दोषदायित्व कालावधी धरला आहे. मात्र, महापालिकेने दुसरी कामे करण्यासाठी हे रस्ते खोदण्याची परवानगी दिल्यास ठेकेदारावर असलेली जबाबदारी संपुष्टात येऊन महापालिकेवर रस्त्यांच्या दुरुस्तीचा भुर्दंड पडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.महापालिकेने २०२३ मध्ये शहरातील रस्त्यांची कामे केली होती. त्या रस्त्यांवर खोदाई करण्यात आली. त्यामुळे १ ते ५ पॅकेजमध्ये काम केलेल्या एकाही रस्त्याचा दोषदायित्व कालावधी राहिलेला नाही. अत्यावश्यक कामे करण्यासाठी खोदाईची परवानगी देण्यात आली.२०२३ मध्ये सुमारे ३०० कोटी रुपये खर्च करून शहराच्या विविध भागांत १०० किलोमीटरचे रस्ते तयार केले होते. या रस्त्यांसाठी पाच वर्षे ‘दोषदायित्व’(डिफेक्ट लायबिलिटी पिरिअड-डीएलपी) कालावधी होता. मात्र, रस्त्यांवर पालिकेच्या पाणीपुरवठा, ड्रेनेज विभागांसह राज्य सरकारच्या विभागांनी खोदाई केली आहे. पालिकेच्या पथ विभागाने या रस्त्यांवर खोदाई करण्यासाठी परवानगी दिल्यामुळे या रस्त्याचा दोषदायित्व कालावधी संपुष्टात आल्याची माहिती समोर आली

### दुरुस्ती करण्याची जबाबदारी

महापालिकेने २०२३ मध्ये पाच पॅकेज तयार करून सुमारे ३०० कोटी रुपयांचे रस्ते तयार करून घेतले. मात्र, महापालिकेने विविध कामांसाठी हे रस्ते खोदाई करण्याची परवानगी दिल्याने पाच वर्षे या रस्त्यांची देखभाल-दुरुस्तीच्या कामातून संबंधित ठेकेदाराची सुटका झाली असून, आता त्यांची देखभाल-दुरुस्ती करण्याची जबाबदारी महापालिकेवर आली आहे.दोन वर्षांपूर्वी महापालिकेच्या पथ विभागाने १००.७८ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे केली.

# मंदिराच्या मंडपासाठी १५ लाखांचा निधी

## विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची घोषणा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**एकवीरा देवी मंदिराच्या पायथ्याशी भाविकांसाठी सभा मंडप उभारण्यासाठी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी त्यांच्या आमदार निधीतून १५ लाख रुपये देण्याची घोषणा केली. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ‘ना हरकत प्रमाणपत्र’ मिळताच सभा मंडपाचे काम तातडीने सुरू करण्यात येईल, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.**



एकवीरा मातेचे दर्शन घेतल्यानंतर परिसरातील सोयी सुविधांची पाहणी डॉ. गोऱ्हे यांनी केली, त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली.डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, ‘मावळ तालुक्यातील कार्ला परिसरातील प्राचीन आणि पवित्र एकविरा माता मंदिर असून, ते महाराष्ट्रातील महत्त्वाचे धार्मिक पर्यटन स्थळ आहे. या ठिकाणी येणाऱ्या भाविकांसाठी सोयीसुविधा आणि सुरक्षिततेसाठी प्रयत्न करण्यात येईल. या परिसरात येणाऱ्या भाविकांकरिता वाहनतळ, खड्डेमय रस्ते आणि भाविकांच्या सोयीशी निगडित विविध कामे प्रलंबित आहेत.‘पीएमआरडीए’ व ‘एमएमआरडीए’च्या वतीने कामे करण्यात येत असून, दोन्ही यंत्रणांमध्ये समन्वय साधून ही कामे वेगाने पूर्ण होणे आवश्यक आहे. याबाबत दिवाळीनंतर विधान भवनात विशेष बैठक घेऊन संबंधित विभागांच्या प्रलंबित प्रश्नांवर निर्णय घेण्यात येईल.’दरम्यान, ‘नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर देवस्थानाच्या वतीने करण्यात आलेल्या तयारीचा आढावाही त्यांनी घेतला. पायरी मार्गावर रेलिंग बसविणे, संरक्षण, लाकडी डोलीतून दर्शन घेणाऱ्या भक्तांची सुरक्षितता, आरोग्यसेवा सुविधा आणि पार्किंग समस्येचे निराकरण करण्यास प्राधान्य द्यावे.

### सुरक्षिततेसाठी प्रयत्न

घेतल्यानंतर परिसरातील सोयी सुविधांची पाहणी डॉ. गोऱ्हे यांनी केली, त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली.डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, ‘मावळ तालुक्यातील कार्ला परिसरातील प्राचीन आणि पवित्र एकविरा माता मंदिर असून, ते महाराष्ट्रातील महत्त्वाचे धार्मिक पर्यटन स्थळ आहे. या ठिकाणी येणाऱ्या भाविकांसाठी सोयीसुविधा आणि सुरक्षिततेसाठी प्रयत्न करण्यात येईल.

**पाणी आरक्षित करण्याची विनंती** जलसंपदा विभागाकडून महापालिकेला राज्यस्तरावर पाठपुराव्याचे निर्देश

# मुळशी धरणातील अतिरिक्त पाण्याचा चेंडू राज्यशासनाच्या कोर्टात!

## जलसंपदा विभागाचा नकार; डिसेंबर २०२३ पासून निर्णयाची प्रतीक्षा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन मुळशी धरणातून ७६० एमएलडी पाणी आरक्षित करण्याची विनंती महापालिकेने जलसंपदा विभागाकडे डिसेंबर २०२३ ला केली होती. मात्र, त्या मागणीस नकार देत राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत जलसंपदा विभागाने महापालिकेस कळविले होते.**




त्यासंदर्भात संबंधित विभागाच्या मंत्र्यांसोबत आयुक्त शेखर सिंह व पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली. मात्र, मुळशी धरणातून पाणी देण्यास अद्यापि प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे मुळशी धरणातील अतिरिक्त ७६० एमएलडी पाण्याकरिता महापालिकेला अजूनही प्रतीक्षाच करावी लागणार आहे.

शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे, त्यामुळे पवना धरण व आंद्रा धरण योजनेचे, तसेच एमआयडीसीचे पाणी कमी पडत आहे. शहराला खेड तालुक्यातील भामा-आसखेड धरणातून १६७ एमएलडी पाणी आणण्याचे काम कासवगतीने सुरू आहे. डिसेंबर २०२४मध्ये काम पूर्ण करण्याचे नियोजन असताना जॅकवेल, पंपिंग स्टेशन, भूमिगत जलवाहिनी आदी कामे अद्यापि सुरू आहेत. आता या प्रकल्पास मार्च २०२६चा नवा मुहूर्त ठरविण्यात आला आहे. भामा आसखेड धरणातून पाणी आणण्यासाठी धरणाजवळ खेड तालुक्यातील वाकी येथे अशुद्ध जलउपसा केंद्रापासून ते तळेगाव येथील ब्रेक प्रेशर टँकपर्यंत ७.३० किलोमीटर अंतराची १७०० मिलिमीटर व्यासाची मुख्य जलवाहिनी टाकण्यात येत आहे. ब्रेक प्रेशर टँकपासून चिखली जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पाणी नेण्यासाठी १८.८० किलोमीटर अंतराची १४०० मिलिमीटर व्यासाची जलवाहिनी टाकण्यात येत आहे. भूमिगत जलवाहिनीचे काम एकूण २६.१० किलोमीटर इतके आहे. जलवाहिनीचे काम आत्तापर्यंत ५५ टक्के झाले आहे. जागा ताब्यात येण्यास व इतर तांत्रिक कारणांमुळे ते काम संथ गतीने सुरू आहे.

यंदा मे महिन्यातच पावसाला सुरुवात झाली. भामा आसखेड धरण १०० टक्के भरले असल्याने तेथे जॅकवेलचे काम करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. ॲप्रोच पूल, स्थापत्य काम, यंत्रसामग्रीची जोडणी, पंपिंग स्टेशन, विद्युतजोडणी आदी कामे करता येत नसल्याचे चित्र आहे.

धरणाचे पाणी कमी झाल्यानंतर ते काम सुरू करण्याचे नियोजन आहे. सध्याची स्थिती लक्षात घेऊन ही दोन्ही कामे मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्याची नवीन मुदत पाणीपुरवठा विभागाकडून निश्चित करण्यात आली आहे. काही अडथळे न आल्यास त्या मुदतीमध्ये जॅकवेल व जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यास एप्रिलपासून शहराला १६७एमएलडी अतिरिक्त पाणी दररोज मिळू शकणार आहे.

> भामा आसखेड पाणी योजनेचे काम प्रगतिपथावर आहे. धरणाजवळ जॅकवेल, पंपिंग स्टेशनचे काम सुरू आहे. तसेच भूमिगत जलवाहिनीच्या कामात येणारे अडथळे दूर करून काम पूर्णत्वास नेण्यात येत आहे. मुदतीमध्ये काम पूर्ण करून शहराला १६७ एमएलडी पाणी देण्याचे नियोजन आहे.
> **-प्रमोद ओंभासे,** मुख्य अभियंता, पाणीपुरवठा विभाग

# महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी “बालसंस्कार”

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची प्रशासनाला सूचना; राष्ट्रीय शिक्षण धोरणाची होणार प्रभावी अंमलबजावणी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**ंडिलक्स चौक ते काळेवाडी मुख्य रस्त्यावर महापालिकेच्या जलनिस्सारण वाहिनीच्या कामानंतर रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. गेल्या महिनाभरापासून रस्त्याची दुरुस्ती न झाल्याने खड्डे आणि चिखलामुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. परिसरातील रहिवाशांनी तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली असून, अपघातांचा धोका दिसेंदिवस वाढत आहे.**



पिंपरी-चिंचवड शहरातील शाळांमधील विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि सामाजिक विकासासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रभावीपणे अंमलबजाणवी करण्यात येणार आहे.तसेच, गीता परिवार यांच्या वतीने शाळांमध्ये बालसंस्कार वर्ग होणार आहेत. भाजपा आमदार महेश लांडगे यांनी याबाबत महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदनाद्वारे मागणी केली होती. त्याला प्रशासनाला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. आमदार लांडगे म्हणाले की, विद्यार्थ्यांना एक सक्षम आणि जबाबदार नागरिक म्हणून घडविणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 (NEP 2020) मधील “बॅगलेस शनिवार” या संकल्पनेच्या अंमलबजावणीसाठी गीता परिवाराच्या माध्यमातून प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना प्रभावी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. “शिक्षकांना विविध कार्यशाळा आणि प्रशिक्षण देऊन त्यांना विद्यार्थ्यांवर सकारात्मक प्रभाव टाकण्यासाठी सक्षम करणे महत्त्वाचे आहे. यासाठी गीता परिवारचे प्रशिक्षण कार्यक्रम उपयुक्त ठरू शकतात. या कार्यक्रमांमध्ये योगसोपान, सूर्यनमस्कार, प्रज्ञासंवर्धन, स्वच्छता अभियान, विज्ञान प्रयोग इत्यादी बाबींचा समावेश केला जाऊ शकतो. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल आणि शाळांमध्ये शिक्षणाची गुणवत्ता सुधारेल.

वास्तविक, तर्कसंगत विचार आणि कार्य करण्यासाठी सक्षम असणाऱ्या तसेच करुणा, सहानुभूती, साहस, लवचिकता, वैज्ञानिक चिंतन, रचनात्मक कल्पनाशक्ती, नैतिक मूल्य असणाऱ्या उत्तम मनुष्यत्वाचा विकास हा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा महत्त्वाचा उद्देश आहे. सध्याच्या काळात लहान वयातही विद्यार्थ्यांना ताण तणाव, उदासीनता, नैराश्य या मानसिक विकारांना सामोरे जावे लागत आहे. या सर्व पार्श्वभूमीवर शालेय जीवनात आनंददायी कृती असण्याची गरज प्रकर्षाने जाणवते. यानुषंगाने “आनंददायी शनिवार” हा उपक्रम राज्य मंडळाच्या सर्व शाळामध्ये इयत्ता १ ली ते ८ वी या इयत्तांसाठी राबविल्यास विद्यार्थ्यांची शिक्षणाची अभिरुची वाढीस लागेल, त्याचा निश्चितच विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर चांगला परिणाम होईल. तसेच विद्यार्थ्यांच्या गळती व अनुत्तीर्ण होण्याचे प्रमाण कमी होईल, विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य जपले जाऊन त्यांचें उत्तम अध्ययन व्हावे या हेतूने राज्य मंडळाच्या सर्व शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी “आनंददायी शनिवार” हा उपक्रम राबवण्यात येत आहे.

> विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य उत्तम राखणे. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक, भावनिक कौशल्ये विकसित करणे, शालेय स्तरावर ताणतणावाचे व्यवस्थापन करण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम बनविणे, विद्यार्थ्यांमध्ये संभाषण कौशल्य विकसित करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास व नैराश्येवर मात करण्याची क्षमता निर्माण करणे यासाठी शिक्षणासोबतच बालसंस्कारांची आवश्यकता आहे. त्या अनुशंगाने प्रशासनाला सूचना केली आहे. त्यावर सकारात्मक कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन प्रशासनाने दिले आहे.
> **-- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# आभास की दुनिया के दोस्तो...




**'ग्लोबल वॉर्मिंग'च्या संकटाची खात्री सगळ्यांनाच पटल्यामुळे जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, विविध देशांतले ट्रस्ट वगैरे अनेकांना पर्यावरणासाठी 'काही तरी' करायचं असतं. तसे प्रयत्न जे कोणी करतील त्यांना बक्कळ आर्थिक साह्य मिळतं. तरीही पृथ्वीची तडफड थांबत नाही...**

त्रकारितेत आलो तेव्हापासून दोनचार शब्दप्रयोगांचा वापर सातत्यानं सुरू आहे. 'ग्रीनहाऊस गॅसेस', 'पृथ्वीभोवतीचा ओझोन थर' आणि 'क्लोरोफ्लुरोकार्बन्स'. त्या वेळी या विषयावर 'आकाशवाणी'वर बरेच कार्यक्रम केले. जयंत एरंडे यांच्याकडे नुकतीच मुंबई आकाशवाणीची धुरा आलेली. विज्ञान विषयावर बरंच काही करायची त्यांची इच्छा आणि आपली विज्ञान पार्श्वभूमी दाखवण्याची आम्हा काहींची हौस असं ते समीकरण छान जुळलं. सुरुवातीच्या धडपडत्या काळात या विषयांनी बराच हात दिला. 'ग्लोबल वॉर्मिंग' हा शब्द फॅशनेबल होण्याआधीचा हा काळ!पुढे काय झालं हे नव्यानं सांगायची गरज नाही. 'ग्लोबल वॉर्मिंग'चं गांभीर्य हळूहळू सगळ्यांना समजलं. नंतर हा विषय प्रत्येक जागतिक कार्यक्रमपत्रिकेत पहिल्या क्रमांकावरचा झाला. वसुंधरेच्या वाढत्या तपमानानं जगाची झोप उडवली. कर्ब उत्सर्जन थांबवायचं जाऊ द्या... ते कमी कसं करता येईल, आपल्या घरातले रेफ्रिजरेटर,



एअरकंडिशनर वगैरेतून बाहेर येणारे क्लोरोफ्लुरोकार्बन्स कमी कसे करता येतील यावर साऱ्या जगाची चर्चा सुरू आहे. पृथ्वीभोवती असलेला ओझोनचा थर अधिक पातळ होणार नाही यासाठी काय काय करायला हवं यासाठी आता परिषदा झडतायत. शास्त्रज्ञ विविध मार्ग सुचवतायत वगैरे असं बरंच काही सुरू आहे. थोडक्यात डोनाल्ड ट्रम्प यांच्यासारखे काही नरपुंगव सोडले तर सगळ्यांनाच 'ग्लोबल वॉर्मिंग' आणि त्यामुळे समोर आ वासून उभ्या ठाकलेल्या संकटाची खात्री पटलीये. या सगळ्यात- म्हणजे पृथ्वीचं तापमान वाढवण्यात- एका घटकाचा वाटा फारच महत्त्वाचा आहे असं लक्षात आलं. कर्ब. म्हणून ज्याच्या ज्याच्यातून कार्बन डायऑक्साइड बाहेर पडतो त्या सगळ्यांचा वापर कमी करायचा, अशी जागतिक टूम निघाली.यात सगळ्यात पहिल्या क्रमांकावर होते हायड्रोकार्बन्सचे घटक. म्हणजे पेट्रोल, डिझेल, रॉकेल, नाफ्ता, डांबर, इत्यादी. साहजिकच या सगळ्यांसाठी पर्याय शोधण्याचे प्रयत्न सुरू झाले. मग कोणी म्हणालं इथेनॉल अधिकाधिक वापरा. कोणी म्हणालं हायड्रोजन हे पुढचं इंधन आहे. सौर-ऊर्जाप्रेमी तर सगळ्यात चेकाळले. यांच्यापैकी कोणी घराच्या गॅलरीत सौरचुलीवर शेंगदाणे, रवा वगैरे भाजलेला असतो. अधिक प्रगतिशील असतात त्यांच्या शेतघरी किंवा गावाकडच्या घरी 'सोलर हीटर'वर पाणी गरम होत असतं. त्यामुळे सौर ऊर्जा हा सगळ्या इंधन समस्येवरचा रामबाण इलाज आहे यावर त्यांची खात्री पटलेली असते. पेट्रोल, डिझेलच्या बरोबरीने आणखीही एक इंधनप्रकार बंद करायला हवा, यावर या सगळ्यांचं एकमत असतं. तो प्रकार म्हणजे कोळसा. कोळसा नकोच आपल्याला, असंच या सगळ्यांचं म्हणणं असतं. त्या ओंगळ खाणी, परिसरात पसरणारी खाणीतली धूळ आणि एकंदरच होणारी खाण परिसराची धूळधाण त्यांना अस्वस्थ करत असते. तसं त्यांचं बरोबरही असतंच. त्यात आता तर आपण '२०३० सालापर्यंत आपल्या ऊर्जा गरजांचा ५० टक्के वाटा हा कर्बशून्य मार्गांतून भागवू' अशी प्रतिज्ञा केलेली आहे. म्हणजे पुढल्या फक्त सहा वर्षांत हे उद्दिष्ट साध्य करण्याचा आपला निर्धार आहे. परत २०७० पर्यंत आपल्या पंतप्रधानांनी देशास 'कार्बन न्यूट्रल' करण्याची घोषणा केलीये. त्यामुळेही अनेकांच्य स्व-अभिमानात भर पडलीये. अर्थात या अभिमानधारींतील अनेकांना 'कार्बन न्यूट्रल' म्हणजे काय, हे कदाचित माहीत नसेल. पण अभिमान बाळगायला काही माहिती असावी लागते असा कुठे नियम आहे? या उद्दिष्टपूर्तीसाठी पुढच्या ४०-४५ वर्षांत आपल्याला आपल्या विद्यामान सौर आणि पवन ऊर्जा क्षमतेत तब्बल ७० पटींनी वाढ करावी लागणार आहे. ती झाली तर या मार्गांनी होणारी वीज ७७०० गिगावॉट इतकी होईल..तर २०७० पर्यंत ७,७०,००० वॉट इतकी महाऊर्जा आपण पर्यावरणस्नेही मार्गांनी निर्माण करू शकू, असा आपला पण आहे. आणि '...तो मुमकीन है' अशी आपली खात्री असल्यानं या शक्याशक्यतेची चर्चा करायची गरजच काय?

## प्रासंगिक »

### 'अभिजात'तेचे भोक!

***मराठी भाषा अधिकृतरीत्या अभिजात झाल्यामुळे आपल्या सांस्कृतिक आयुष्यात फरक पडणार आहे का आणि कोणता? त्या फरकात आपले योगदान काय?***

जातिवंत अभिजाततेच्या बळावर शेकडो वर्षांची वैभवशाली भाषिक परंपरा निर्माण करणाऱ्या मायमराठीला अखेर ती अभिजात असल्याची मान्यता दिल्याबद्दल केंद्र सरकारचे आभार मानायचे तर पुढील महिन्यात होऊ घातलेली विधानसभा निवडणूक नजरेआड करता येत नाही. अर्थात कोणत्या का निमित्ताने होईना, गेली अनेक वर्षे सुरू असलेले अनेकांचे अथक प्रयत्न मार्गी लागले आणि तमीळ, संस्कृत, कन्नड, मल्याळम् आणि उडिया यांच्याप्रमाणेच मराठीही आता अधिकृतपणे अभिजात भारतीय भाषा झाली, याबद्दल समस्त मराठी जनांचे अभिनंदन. आता हा दर्जा मिळाल्यानंतर केंद्र सरकारकडून दरवर्षी १०० कोटी रुपयांपर्यंतचा निधी अपेक्षित असून त्यामधून राज्य सरकारने मराठी भाषेच्या विकासासाठी काम करणे अपेक्षित आहे.

पंतप्रधानांनी २०४७ पर्यंत 'विकसित भारता'चे स्वप्न आपल्यासमोर ठेवले आहे. 'विकसित भारत' म्हणजे फक्त जीडीपीमधील वाढ नव्हे, तर सामान्य माणसापर्यंत विकासाचे फायदे पोहोचणे आणि सर्वांना रोजगारसंधी मिळणे हेही अपेक्षित आहे.

## विकसित भारता'चे स्वप्न आणि 'व्यवस्थे'चे वास्तव

परंतु आज सामान्य माणसाचे प्रश्न सोडवण्यासाठी लागणारे विचार, विज्ञान व नियोजन बळ आपल्यापाशी आहे का, हा मोठा प्रश्न आहे. त्याचे उत्तर शोधण्यासाठी सध्याची राजकीय, आर्थिक आणि ज्ञाननिर्मितीची व्यवस्था नेमकी कशी आहे आणि त्यात हे प्रश्न नेमके कसे व कुठे बसतात, व ते सोडवण्यात अडचणी काय, याचे समीक्षण करणे हा या लेखाचा उद्देश.सामान्य माणसाच्या दैनंदिन आयुष्यातल्या प्रश्नांची उदाहरणे : 'माझी बस का उशिरा येते?' हा एसटीने प्रवास करणाऱ्या विद्यार्थिनीला पडणारा प्रश्न. 'माझ्या विहिरीतील पाणी लवकर का आटते?' हा मराठवाडयातील छोटया शेतकऱ्याचा प्रश्न. 'मी बनवलेल्या फर्निचरला मागणी का नाही?' हा शहरातील सुतारकाम-उद्योजकाला पडणारा प्रश्न. त्याचप्रमाणे 'बारावीच्या मार्कावर माझ्या मुलीला डॉक्टर का होता येत नाही?' हे सर्व भारतातील बहुतांश लोकांच्या रोजच्या जीवनातले



प्रश्न आहेत. यांना आपण 'मूलभूत भौतिक प्रश्न' असे म्हणूया. आपली राजकीय व प्रशासकीय परिस्थिती बघितली तर घटनेप्रमाणे, केंद्रीय व्यवस्थेला सर्वोच्च स्थान आणि राज्यव्यवस्थेला दुय्यम स्थान आहे. केंद्रीय व्यवस्थेत केंद्र शासनाकडे, आणि त्यातही विशेषत: पंतप्रधान पदाकडे सत्तेचे आत्यंतिक केंद्रीकरण झालेले आहे. केंद्र शासनाचे विभाग व उपक्रम, 'आयएएस'प्रणीत प्रशासन व्यवस्था, आयआयटी आदी उच्चशिक्षण संस्था, भारतीय हवामान विभाग अशा वैज्ञानिक संस्था मिळून ही राष्ट्रीय व्यवस्था चालवतात. दुष्काळ जाहीर करण्यापासून खाद्यपदार्थांची चाचणी याचे तांत्रिक निकष व सर्वेक्षण पद्धती या संस्था ठरवतात. स्थानिक पातळीवर उपयोगी पडणारे ज्ञान निर्माण करण्याचे राज्यांचे अधिकार खूपच मर्यादित आहेत आणि ज्ञाननिर्मितीची क्षमताही कमी आहे. अशा केंद्रीकृत व्यवस्थेत कार्यकारी अधिकार हे वरच्या पातळीवर एकवटतात. वैद्यकीय पदवीच्या प्रवेशासाठी राष्ट्रीय पातळीवरची एकच परीक्षा, हे अशा अधिकारांच्या केंद्रीकरणाचेच उदाहरण. या केंद्रीय प्रशासन व्यवस्थेचे लोकसभा व राज्यसभा यांना उत्तरदायित्व अत्यंत कमी आहे. राहिलेच, तर ते सर्वोच्च न्यायालय आणि काही प्रमाणात प्रसारमाध्यमांशी आहे. अनेक क्षेत्रांत वस्तुनिष्ठ माहितीचा अभाव दिसतो तो यामुळे. राज्यांच्या सार्वजनिक बस सेवेचा तुलनात्मक अभ्यास, रेल्वे अपघातांचे विश्लेषण अथवा कोविड-बळींची अधिकृत टक्केवारी यात राज्याराज्यांमधील मोठी तफावत याची कारणमीमांसा – असे अभ्यास क्वचितच मांडले जातात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## पुन्हा अतिवृष्टी
## एनडीआरएफची पथके दाखल; ५०० सुरक्षितस्थळी

# अहिल्यानगर : 35 मंडलात अतिवृष्टी

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या सुमारे आठवडाभरापासून सुरू असलेल्या सततच्या अतिवृष्टीने जिल्ह्याचा दक्षिण भाग बेजार झाला आहे. गेल्या चोवीस तासांत पुन्हा ३५ मंडलांमध्ये अतिवृष्टी झाली. त्यामुळे दक्षिण भागात केंद्रीय व राज्य बचाव पथके (एनडीआरएफ व एसडीआरएफ ) तैनात करण्यात आली आहेत. दरम्यान, रात्रीच्या पावसाने ४१ घरांची पडझड झाली तर १४ पशूधन मृत्युमुखी पडले. शेवगाव, कर्जत, जामखेड, पाथर्डी तालुक्यातील पुरामध्ये अडकलेल्या सुमारे ५०० जणांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून उपलब्ध झाली.**

## ओढे-नाल्यांना पूर आले



दरम्यान ठिकठिकाणच्या नद्या, ओढे-नाल्यांना पूर आले आहेत. काही ठिकाणी पूल वाहून गेले व तलाव फुटले आहेत. शेतीपिके पाण्याखाली गेली आहेत. धरणे ओसंडून वाहत असल्याने नदीपात्रातील विसर्गही वाढवण्यात आला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना प्रशासनाने सावधानतेचा इशारा दिला आहे. हवामान विभागाने उद्या बुधवारी जिल्ह्याला येलो अलर्ट जारी केला आहे. एनडीआरएफचे पथक कर्जतमध्ये तर एसडीआरएफचे पथक पाथर्डीत रात्रीपासूनच तैनात करण्यात आले आहे. या पथकांनी जामखेडमधील तरडगाव, कर्जतमधील निंबोडी, मलठण, सीतपूर, शेवगावमधील आखेगाव, भगूर, खरडगाव आदी परिसरात पुरात अडकलेल्या सुमारे ५०० नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवले. रात्रीच्या पावसाने जामखेडमधील २०, राहुरीतील ६, नगर ४, नेवासा ५, संगमनेर १, कर्जत ५ अशा एकूण ४१ घरांची पडझड झाली तसेच जामखेड ४ राहुरी २, संगमनेर ६, नगर २ अशा एकूण १४ शेळ्या भिंत पडून दगावल्या आहेत. सलाबतपूरमध्ये चोवीस तासांत ६ इंच अतिवृष्टी झालेली मंडले पुढीलप्रमाणे (आकडे मिमी.) : नेवासा- सलाबतपूर १५०.३, कुकाना ८३.८. पाथर्डी- अकोले १०७.५, खरवंडी १३१, तिसगाव ७५, मिरी ७६.५, करंजी ६६.५, कोरडगाव १०७.५, टाकळी १३१, माणिकदौंडी ६५.३. पाथर्डी ६५.३. शेवगाव- शेवगाव १३१.३, भातकुडगाव ८३.८. बोधेगाव १४८.८, चापडगाव २४८.८ ढोर जळगाव ११२.८, दहिगावने ११२.८, मुंगी १४२.८. जामखेड- आरणगाव ११५.३, खर्डा ७६.८, नान्नज ८५.८, नायगाव ९४.३. पाटोदा ८५.८, साकत ९४.३. कर्जत- कोंभळी ७६.५, मिरजगाव १०१.३, माही जळगाव ८८. श्रीगोंदा- मांडवगण ६८.३. पारनेर- भाळवणी ६९.८. नगर- सावेडी ८४, केडगाव ७०.५, वाळकी ६९.३, नेप्ती ७०.८ व रूईछत्तीशी ६७.८ मिमी.दरम्यान ठिकठिकाणच्या नद्या, ओढे-नाल्यांना पूर आले आहेत. काही ठिकाणी पूल वाहून गेले व तलाव फुटले आहेत. शेतीपिके पाण्याखाली गेली आहेत. धरणे ओसंडून वाहत असल्याने नदीपात्रातील विसर्गही वाढवण्यात आला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना प्रशासनाने सावधानतेचा इशारा दिला आहे. हवामान विभागाने उद्या बुधवारी जिल्ह्याला येलो अलर्ट जारी केला आहे. एनडीआरएफचे पथक कर्जतमध्ये तर एसडीआरएफचे पथक पाथर्डीत रात्रीपासूनच तैनात करण्यात आले आहे.या पथकांनी जामखेडमधील तरडगाव, कर्जतमधील निंबोडी, मलठण, सीतपूर, शेवगावमधील आखेगाव, भगूर, खरडगाव आदी परिसरात पुरात अडकलेल्या सुमारे ५०० नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवले. रात्रीच्या पावसाने जामखेडमधील २०, राहुरीतील ६, १४२.८.६.८, नान्नज ८५.८, नायगाव ९४.३. पाटोदा ८५.८, साकत ९४.३. कर्जत- कोंभळी ७६.५, मिरजगाव १०१.३, माही जळगाव ८८. श्रीगोंदा- मांडवगण ६८.३. पारनेर- भाळवणी ६९.८. नगर- सावेडी ८४, केडगाव ७०.५, वाळकी ६९.३, नेप्ती ७०.८ व रूईछत्तीशी ६७.८ मिमी.

## काही ठिकाणी पूल वाहून गेले

दरम्यान ठिकठिकाणच्या नद्या, ओढे-नाल्यांना पूर आले आहेत. काही ठिकाणी पूल वाहून गेले व तलाव फुटले आहेत. शेतीपिके पाण्याखाली गेली आहेत. धरणे ओसंडून वाहत असल्याने नदीपात्रातील विसर्गही वाढवण्यात आला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांना प्रशासनाने सावधानतेचा इशारा दिला आहे. हवामान विभागाने उद्या बुधवारी जिल्ह्याला येलो अलर्ट जारी केला आहे.

# पेरणी ते विक्री प्रक्रिया सुलभ होणार

## पणन विभागाच्या कृती दलाची स्थापना करण्यात येणार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिकाची पेरणी ते विक्री ही प्रक्रिया अधिक सुलभ व समन्वयाने होण्यासाठी कृषी, पणन विभागाच्या कृती दलाची स्थापना करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना पेरणी ते विक्री पर्यंत मार्गदर्शन मिळाल्यास शेतमालाला भाव मिळून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होईल, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.**



पणन मंत्री जयकुमार रावळ यांनी पणन व कृषी विभागातील प्रकल्प अधिक गतीमान पद्धतीने राबवावेत, असे आदेशही या बैठकीत दिले.मंत्रालयात पणन व कृषी विभागातील विविध प्रकल्पांच्या कामाच्या समन्वयाबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, पणन मंत्री जयकुमार रावळ, सहकार विभागाचे सचिव प्रवीण दराडे, कृषी आयुक्त सुरज मांढरे यांच्यासह कृषी आणि पणन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. पिकाची पेरणी ते प्रत्यक्ष उत्पादन अधिक होण्यासाठी कृषी विभाग विविध उपाययोजना करत असते. शेतकऱ्यांनी कोणत्या पिकाची पेरणी करावी जेणेकरून पिकाला विक्री पश्चात अधिक भाव मिळेल. हवामान अंदाज, शेतमालाची विक्री हे सर्व मार्गदर्शन करावे, यासाठी पीक काढणी मार्गदर्शक अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येईल.

## गोदाम उभारण्यासाठी प्रस्ताव

पणन व कृषी विभागातील अधिकारी यांनी समन्वयातून काम करावे. स्मार्ट प्रकल्पाअंतर्गत भागीदारीतून उभारण्यात येणारी गोदामांची कामे करणे, समुदाय आधारित संस्थांना भागीदारी माध्यमातून विकेंद्रीत गोदाम उभारणे तसेच समृद्धी महामार्ग – ॲग्रो लॉजिस्टीक पार्क उभारण्यासंदर्भात कृषी विभाग सर्वोतोपरी सहकार्य करेल, असे भरणे यांनी सांगितले.शेतकऱ्यांना शेतीमध्ये कोणते पीक घेतले तर योग्य फायदा मिळेल यासाठी कृषी व पणन विभागाकडून योग्य मार्गदर्शन आवश्यक आहे. स्मार्ट प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक संस्थांच्या बरोबरीने विकेंद्रित गोदामांची कामे लवकर पूर्ण करा. २२ जिल्ह्यांत ३५ तालुक्यांच्या ठिकाणी गोदाम उभारण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.


## रोजगारवाढीची शक्यता
## आउटसोर्सिंग अन्य देशांमध्ये रोजगारवाढीची शक्यता

# 'एच-1बी' शुल्कवाढीचा परिणाम!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ट्रम्प प्रशासनाने 'एच-१बी' व्हिसावर एक लाख डॉलर शुल्क लावल्याचा परिणाम अमेरिकेतील 'सिलिकॉन व्हॅली'सह इतर ठिकाणीही जाणवू लागला आहे. अमेरिकेत रोजगार तयार होण्याऐवजी कंपन्या आपली कामे भारतासह इतर देशांत नेण्याचा विचार करीत आहेत.**

### हा व्हिसा मोठ्या प्रमाणावर लागतो




'एच-१बी' व्हिसा हा अनेक तंत्रज्ञानाशी संबंधित कंपन्यांच्या भरतीतील प्रक्रियांचा एक भाग आहे. तसेच, याद्वारे आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना अमेरिकेत पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रोत्साहन दिले जात असे. मात्र, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक लाख डॉलर इतके शुल्क नव्या अर्जदारांसाठी लावल्याचे घोषित केल्यानंतर कंपन्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून, कंपन्यांनी चक्क भरती काही काळ थांबविली आहे.कोलोरॅडो येथील 'हॉलंड अँड हार्ट'चे स्थलांतरितांसाठीचे वकील ख्रिस थॉमस म्हणाले, 'माझी विविध कॉर्पोरेट कंपन्यांशी चर्चा झाली. व्हिसासाठीचे नवे शुल्क अमेरिकेमध्ये जवळपास न परवडणारे आहे. त्यामुळे आम्हाला चांगल्या कौशल्याधारित कामगारांसाठी इतर देशांच्या पर्यायांकडे पाहण्याशिवाय गत्यंतर नाही. ती वेळ आता आली आहे. 'फॉर्चुन १००' सारख्या कंपन्यांही या धोरणांतर्गत आम्ही पुढे अमेरिकेत काम सुरू ठेवू शकत नाही.'अमेरिकेत २०२४ मध्ये १.४१ लाख एच-१बी व्हिसा मंजूर झाले होते. या व्हिसाला दर वर्षासाठी ६५ हजारांची मर्यादा आहे. पण, विद्यापीठांतील शिक्षणासाठी ही मर्यादा लागू नाही. कम्प्युटरशी संबंधित नोकऱ्यांमध्ये हा व्हिसा मोठ्या प्रमाणावर लागतो.ट्रम्प यांनी एच-१बी व्हिसावरील लागू केलेल्या शुल्कवाढीने अमेरिकेतील रोजगार वाढतील, असे धोरणसमर्थकांचे म्हणणे आहे. मात्र, या नव्या धोरणामुळे आयटी कंपन्यांसमोर नवी आव्हाने तयार झाली आहेत. एका कृत्रिम बुद्धिमत्तेशी निगडित 'स्टार्ट-अप' सीईओ आणि सहसंस्थापक सॅम लिआंग यांनी त्यांच्याकडील एच-१बी व्हिसाधारकांची संख्या कमी करावी लागेल, असे म्हटले आहे. काही कंपन्या त्यांच्याकडील काम करण्यासाठी भारतासह इतर देशांत भरती करतील, असा अंदाज असल्याचेही ते म्हणाले. 'स्टार्ट-अप'साठीही ही समस्या असल्याचे ते म्हणाले. अमेरिकेतील निम्म्याहून अधिक स्टार्ट-अप हे एक अब्ज डॉलर किंवा त्याहून अधिक किमतीचे आहेत. अमेरिकेतीलच एका अहवालानुसार, या स्टार्ट-अपच्या संस्थापकांमध्ये किमान एक जण स्थलांतरित आहे. या नव्या धोरणाचा या स्टार्ट-

### 'स्टार्ट-अप'समोर आव्हान

कम्प्युटरशी संबंधित नोकऱ्यांमध्ये हा व्हिसा मोठ्या प्रमाणावर लागतो.ट्रम्प यांनी एच-१बी व्हिसावरील लागू केलेल्या शुल्कवाढीने अमेरिकेतील रोजगार वाढतील, असे धोरणसमर्थकांचे म्हणणे आहे. मात्र, या नव्या धोरणामुळे आयटी कंपन्यांसमोर नवी आव्हाने तयार झाली आहेत. एका कृत्रिम बुद्धिमत्तेशी निगडित 'स्टार्ट-अप' सीईओ आणि सहसंस्थापक सॅम लिआंग यांनी त्यांच्याकडील एच-१बी व्हिसाधारकांचा संख्या कमी करावी लागेल.

अपवर परिणाम होणार आहे.या धोरणाचे काही उदारमतवाद्यांनी मात्र आश्चर्यकारकरीत्या समर्थन केले आहे. 'नेटफ्लिक्स'चे सहसंस्थापक रीड हॅस्टिंग यांनी ट्रम्प यांच्या या धोरणामुळे केवळ अतिशय कुशल असे कामगारच अमेरिकेत येतील, अशी प्रतिक्रिया दिली आहे. स्थलांतरितांसाठी असे नियम आवश्यक असल्याचे डीडी दास या एका स्टार्ट-अपच्या संस्थापकाने म्हटले आहे.'एच-१बी' व्हिसा हा अनेक तंत्रज्ञानाशी संबंधित कंपन्यांच्या भरतीतील प्रक्रियांचा एक भाग आहे. तसेच, याद्वारे आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना अमेरिकेत पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रोत्साहन दिले जात असे. मात्र, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक लाख डॉलर इतके शुल्क नव्या अर्जदारांसाठी लावल्याचे घोषित केल्यानंतर कंपन्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून, कंपन्यांनी चक्क भरती काही काळ थांबविली आहे.कोलोरॅडो येथील 'हॉलंड अँड हार्ट'चे स्थलांतरितांसाठीचे वकील ख्रिस थॉमस म्हणाले, 'माझी विविध कॉर्पोरेट कंपन्यांशी चर्चा झाली. व्हिसासाठीचे नवे शुल्क अमेरिकेमध्ये जवळपास न परवडणारे आहे. त्यामुळे आम्हाला चांगल्या कौशल्याधारित कामगारांसाठी इतर देशांच्या पर्यायांकडे पाहण्याशिवाय गत्यंतर नाही. ती वेळ आता आली आहे. 'फॉर्चुन १००' सारख्या कंपन्यांही या धोरणांतर्गत आम्ही पुढे अमेरिकेत काम सुरू ठेवू शकत नाही.'अमेरिकेत २०२४ मध्ये १.४१ लाख एच-१बी व्हिसा मंजूर झाले होते.

## १० बळी; कोलकात्यामध्ये जनजीवन विस्कळीत
## कोलकात्यामध्ये जनजीवन विस्कळीत; शैक्षणिक संस्थांना सुट्टी जाहीर

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पश्चिम बंगालची राजधानी असलेल्या कोलकाता शहरात सोमवार रात्रीपासून पडलेल्या मुसळधार पावसामुळे एकूण १० जणांचा मृत्यू झाला आहे. त्यापैकी नऊ जणांचा मृत्यू विजेचा धक्का लागून झाल्याचे सांगण्यात आले. कोलकात्यामध्ये गेल्या चार दशकातील सर्वाधिक पावसाची नोंद झाली आहे. हा पाऊस अभूतपूर्व असल्याचे मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी सांगितले आणि नागरिकांना घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले.**




कोलकात्यात २४ तासांपेक्षा कमी अवधीमत २५१.४ मिमी पाऊस नोंदवण्यात आला. येथे १९८६पासून पडलेला हा सर्वात जास्त पाऊस असून, गेल्या १३७ वर्षांमध्ये हा सहाव्या क्रमांकाचा पाऊस असल्याची माहिती देण्यात आली. या अतिवृष्टीमुळे कोलकात्यातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. हवाई, रेल्वे आणि रस्ते वाहतुकीत मोठ्या प्रमाणात अडथळे आले, शैक्षणिक संस्था बंद राहिल्या आणि राज्यातील सर्वात महत्त्वाचा सण असलेल्या


### 'रागासा' चक्रीवादळाचा धोका

मी अशा प्रकारचा पाऊस कधीही पाहिला नाही. एकूण १० जणांचा मृत्यू झाला आहे. त्यापैकी नऊ जणांचा मृत्यू विजेच्या उघड्या किंवा नादुरुस्त तारांमुळे धक्का बसून झाला. कोलकात्यामध्ये आठ तर शेजारील जिल्ह्यांमध्ये दोघांचा मृत्यू झाला. 'सीईएससी'ने मृतांच्या नातेवाईकांना नोकरी दिली पाहिजे. तसेच त्यांना किमान पाच लाख रुपये नुकसानभरपाई दिली पाहिजे

दुर्गापूजेसाठी दिली जाणारी सुट्टी आधीच जाहीर करावी लागली. दुर्गापूजा पुढील आठवड्यात सुरू होत आहे. त्यापूर्वी पाऊस सामान्य होईल अशी जनतेची अपेक्षा होती पण सोमवार आणि मंगळवारच्या पावसाने ती फोल ठरवली. पावसाच्या पाण्याचा निचरा न झाल्यामुळे रस्त्यांना नदीचे स्वरूप प्राप्त झाले होते. अनियमितपणेदावा ममता बॅनर्जी यांनी केला. तसेच, विजेचा धक्का बसून नऊ जणांचा मृत्यू झाल्याबद्दल त्यांनी 'सीईएससी' या खासगी ऊर्जा कंपनीच्या निष्काळजीपणावर टीका केली.

# शारदीय नवरात्रोत्सवात पर्यटनासाठी 'या' ठिकाणांची करा निवड!

पुणे : भारतात नवरात्रीचा सण मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. विशेषतः शारदीय नवरात्रीमध्ये दुर्गा मातेच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाते. तसेच पूजेसाठी मंडप उभारले जातात. देशातील अनेक ठिकाणी गरबा कार्यक्रमांचे आयोजन केले जातेयंदा शारदीय नवरात्री 03 ऑक्टोंबर ते 11 ऑक्टोबर दरम्यान साजरा होता असून यादरम्यान अनेक सुट्ट्या आहेत. या दिवसांत तुम्हाला नवरात्रीचा आनंद घ्यायचा असेल, तर तुम्ही या ठिकाणांना भेट देवू शकता. आम्ही तुम्हाला हा सण अनुभवण्यासाठी काही उत्तम ठिकाणांची माहिती सांगत आहोत. या ठिकाणी तुम्ही भेट दिला तर कधीही नवरात्रीचा प्रसंग विसरणार नाही...








## वाराणसी

वाराणसी हे उत्तर प्रदेशातील सर्वात पवित्र शहरांपैकी एक आहे. येथे नवरात्रोत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो. येथे हजारो दिवे वाराणसीच्या घाटांना प्रकाशित करतात. रामचरितमानसचे मंत्र दहा दिवस संपूर्ण शहरात गुंजतात. उत्तर प्रदेशातील नवरात्रीतीत रामलीला हा एक नृत्य प्रकार सर्वाधिक लोकप्रिय आहे. ते पाहण्यासाठी दरवर्षी लाखो लोक येतात.

## कोलकाता

नवरात्रोत्सव साजरा करण्यासाठी कोलकाता हे एक उत्तम ठिकाण आहे. नवरात्रीच्या काळात, पश्चिम बंगालच्या प्रत्येक कोपऱ्यात दुर्गा देवीच्या मोठ्या मूर्ती बनवता येतात. त्या मोठ्या पंडालमध्ये ठेवल्या जातात. कोलकात्यात नवरात्रोत्सव दुर्गा पूजा किंवा दुर्गोत्सव म्हणून ओळखला जातो.




## म्हैसूर

नवरात्रीच्या दरम्यान कर्नाटकला भेट देण्याचे मुख्य कारण म्हणजे हजारो दिव्यांनी उजळून निघालेल्या म्हैसूर रॉयल पॅलेसला भेट देणे. दसऱ्याला येथे नधब्बा सण म्हणूनही ओळखले जाते. हा दहा दिवसांचा उत्सव आहे. ज्यामध्ये संपूर्ण म्हैसूरमध्ये अनेक नृत्यांचे प्रकार सादर केले जातात आणि गायनही होते.

## अहमदाबाद

गुजरातमधील नवरात्र हा जगातील सर्वात मोठा पारंपरिक नृत्य उत्सव आहे. या 9 दिवसांमध्ये गुजराती लोक चमकदार रंगाच्या कपड्यांमध्ये दांडिया आणि गरबाच्या तालावर नाचताना दिसतात. इथे गरबा नाईटला नक्की जावे, असे सांगितले जाते.



## वैष्णो देवी मंदिर

श्री वैष्णोदेवी मंदिराची सजावट केली जाते. यानिमित्त लाखो लोक दर्शनासाठी येतात. कतारपासून 14 किमी अंतरावर उंच टेकडीवर असलेल्या वैष्णो देवी धाममध्ये 9 दिवस वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

## आशिया चषक फायनल

## श्रीलंकेवरील पाक संघाच्या विजयाने बदललं समीकरण

# भारत-पाकिस्तानमध्ये होऊ शकते फायनल!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ सुपर फोरमधील चार संघांमधील लढत अधिक अटीतटीची होत आहे. भारत आणि बांगलादेश यांचे एकेक सामने झाले आहेत. तर पाकिस्तान व श्रीलंका यांचे दोन सामने झाले आहेत. यानंतर आता गुणतालिका पाहता भारत आणि पाकिस्तान यांच्यात अंतिम सामना होऊ शकतो. पाकिस्तानच्या विजयानंतर गुणतालिकेचं कसं चित्र आहे पाहूया.**

## आशिया चषकाच्या गुणतालिकेत बदल



पाकिस्तान संघाने सुपर फोरमधील श्रीलंकेविरूद्ध सामन्यात विजय मिळवला आहे. या विजयासह पाकिस्तानच्या संघाने अंतिम फेरीतील आपल्या आशा जिवंत ठेवल्या आहेत. तर श्रीलंकेचा संघ आशिया चषकातून बाहेर होण्याच्या मार्गावर पोहोचला आहे.पाकिस्तानने सुपर फोरमधील श्रीलंकेविरूद्धची सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. पाकिस्तानच्या गोलंदाजांनी चांगली कामगिरी करत श्रीलंकेला मोठी धावसंख्या उभारू दिली नाही. परिणामी श्रीलंकेचा संघ १३३ धावाच करू शकला. तर प्रत्युत्तरात पाकिस्तानने चांगली सुरूवात करत संघाच्या विजयाचा पाया रचला. श्रीलंकेच्या फिरकीपटूंनी हसरंगा आणि तीक्ष्णाने झटपट विकेट घेत पुनरागमन केलं होतं. पण हुसैन तलत आणि मोहम्मद नवाजच्या अर्धशतकी भागीदारीने पाकिस्तानला १८व्या षटकात विजय मिळवून दिला. पाकिस्तान आणि श्रीलंका यांच्यातील सामन्यानंतर गुणतालिकेत भारतीय संघ अद्याप पहिल्या स्थानी आहे. भारताने पहिला सामना जिंकत कमालीच्या ०.६८९ च्या नेट रन रेटसह पहिलं स्थान कायम ठेवलं आहे. तर पाकिस्तानने श्रीलंकेवर १८ षटकांत विजय मिळवल्याने गुणतालिकेत दुसरं स्थान गाठलं आहे. पाकिस्तानचा नेट रन रेट ०.२२६ आहे. तर बांगलादेशने पहिला सामना जिंकल्याने त्यांचा नेट रन रेट ०.१२१ आहे आणि संघ तिसऱ्या स्थानी आहे. तर श्रीलंकेने दोन्ही सामने गमावल्याने संघ चौथ्या स्थानी आहे.भारत आणि बांगलादेश यांच्यात २५ सप्टेंबरला सामना होणार आहे. या सामन्यात जर भारताने बांगलादेशचा पराभव केला तर श्रीलंकेचं स्पर्धेतील आव्हान संपुष्टात येईल. याशिवाय भारताने बांगलादेशला हरवलं तर टीम इंडिया थेट अंतिम फेरीत दाखल होईल. यानंतर बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यात होणारा सामना निर्णायक ठरेल. या सामन्यात पाकिस्तानने विजय मिळवला तर संघ अंतिम फेरीत जाईल.

## श्रीलंकेचं आव्हान संपुष्टात

तर बांगलादेशने पहिला सामना जिंकल्याने त्यांचा नेट रन रेट ०.१२१ आहे आणि संघ तिसऱ्या स्थानी आहे. तर श्रीलंकेने दोन्ही सामने गमावल्याने संघ चौथ्या स्थानी आहे.भारत आणि बांगलादेश यांच्यात २५ सप्टेंबरला सामना होणार आहे. या सामन्यात जर भारताने बांगलादेशचा पराभव केला तर श्रीलंकेचं स्पर्धेतील आव्हान संपुष्टात येईल.

पण बांगलादेशने मोठ्या फरकाने पाकिस्तानवर विजय मिळवला तर नेट रन रेटमुळे बांगलादेश अंतिम सामन्यात भारताविरूद्ध खेळेल.पाकिस्तान संघाने सुपर फोरमधील श्रीलंकेविरूद्ध सामन्यात विजय मिळवला आहे. या विजयासह पाकिस्तानच्या संघाने अंतिम फेरीतील आपल्या आशा जिवंत ठेवल्या आहेत.

तर श्रीलंकेचा संघ आशिया चषकातून बाहेर होण्याच्या मार्गावर पोहोचला आहे. पाकिस्तानने सुपर फोरमधील श्रीलंकेविरूद्धची सामन्याची नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. पाकिस्तानच्या गोलंदाजांनी चांगली कामगिरी करत श्रीलंकेला मोठी धावसंख्या उभारू दिली नाही. परिणामी श्रीलंकेचा संघ १३३ धावाच करू शकला. तर प्रत्युत्तरात पाकिस्तानने चांगली सुरूवात करत संघाच्या विजयाचा पाया रचला. श्रीलंकेच्या फिरकीपटूंनी हसरंगा आणि तीक्ष्णाने झटपट विकेट घेत पुनरागमन केलं होतं. पण हुसैन तलत आणि मोहम्मद नवाजच्या अर्धशतकी भागीदारीने पाकिस्तानला १८व्या षटकात विजय मिळवून दिला. पाकिस्तान आणि श्रीलंका यांच्यातील सामन्यानंतर गुणतालिकेत भारतीय संघ अद्याप पहिल्या स्थानी आहे. भारताने पहिला सामना जिंकत कमालीच्या ०.६८९ च्या नेट रन रेटसह पहिलं स्थान कायम ठेवलं आहे. तर पाकिस्तानने श्रीलंकेवर १८ षटकांत विजय मिळवल्याने गुणतालिकेत दुसरं स्थान गाठलं आहे. पाकिस्तानचा नेट रन रेट ०.२२६ आहे.

# पाकिस्तानचा सुपर फोरमध्ये मोठा विजय

## श्रीलंका आशिया चषक स्पर्धेतून बाहेर होण्याच्या मार्गावर

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक सुपर फोरमधील दुसऱ्या सामन्यात पाकिस्तानने श्रीलंका संघावर शानदार विजय मिळवला आहे. या विजयासह पाकिस्तानने अंतिम सामना खेळण्याचा आशा कायम ठेवल्या आहेत. पाकिस्तानच्या मधल्या फळीने आणि गोलंदाजांनी चांगली कामगिरी करत या विजयात मोठं योगदान दिलं आहे.बांगलादेश यांच्यातील सामन्यात जर भारताने बांगलादेशवर विजय मिळवला तर श्रीलंकेचं स्पर्धेतील आव्हान संपुष्टात होईल.**



पाकिस्तानने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला, हा निर्णय संघाच्या पथ्यावर पडला. पाकिस्तानच्या वेगवान गोलंदाजांनी उत्कृष्ट कामगिरी करत श्रीलंकेच्या फलंदाजांना मोठी धावसंख्या उभारू दिली नाही. श्रीलंकाकडून कामिंदू मेंडिसने अर्धशतक झळकावलं. याशिवाय इतर सर्व फलंदाज १५ धावांची खेळीदेखील करू शकले नाहीत. तर कुसल मेंडिस आणि दासुन शनाका हे फलंदाज शून्यावर बाद झाले.पाकिस्तानकडून शाहीन शाह आफ्रिदीने ३ विकेट्स, हारिस रौफ व हुसैन तलत यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. तर अबरार अहमदने १ विकेट घेतली. यासह श्रीलंकेच्या संघाने प्रथम फलंदाजी करताना ८ विकेट्स गमावत १३३ धावा केल्या. श्रीलंकेने दिलेल्या १३३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानने पॉवरप्लेमध्ये चांगली सुरूवात केली आणि संघाने एकही विकेट न गमावता ४५ धावा केल्या. पण त्यानंतर पुन्हा एकदा पाकिस्तानने झटपट विकेट गमावल्या. पण मोहम्मद नवाज आणि हुसैन तलतने अर्धशतकी भागीदारी करत पाकिस्तानचा डाव सांभाळला.

## १७ चेंडूत चार विकेट गमावल्या

आणि संघाला विजय मिळवून देण्यात मोठी भूमिका बजावली.साहिबजादा फरहानने मैदानात येताच आक्रमक फलंदाजी सुरू केली आणि फखर जमानसह ४५ धावांची जलद भागीदारी करत संघाला चांगल्या स्थितीत आणलं. पण, सहाव्या आणि नवव्या षटकांदरम्यान पाकिस्तानने केवळ १७ चेंडूत चार विकेट गमावल्या.

स्मार्ट PCMC
SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। बुधवार ।
। दि. 24 सप्टेंबर 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांचे भरीव योगदान

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे शिक्षक खरे शिल्पकार- डॉ. शहा

### शिक्षण विश्व: प्रतिभा ज्युनिअर कॉलेजच्या शिक्षकांचा गुणवंत शिक्षक पुरस्काराने गौरव

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चांगल्या समाजाची घडण ही गुणवत्तापूर्ण शिक्षणावर अवलंबून असते. विद्यार्थ्यांच्या केवळ शैक्षणिक प्रगतीसाठीच नव्हे, तर त्यांच्यातील नैतिकता, आत्मविश्वास, सामाजिक जाणिवा, नेतृत्वगुण यांचा विकास घडवण्यामध्ये शिक्षकांचे योगदान मोलाचे असते. म्हणूनच शिक्षण घडवणारे खरे शिल्पकार म्हणजे शिक्षक असल्याचे मत चिंचवड येथे कमला एज्युकेशन सोसायटीचे सचिव डॉ दीपक शहा यांनी व्यक्त केले.**




चिंचवड येथे कमला एज्युकेशन सोसायटीच्या प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटमधील प्रतिभा ज्युनिअर कॉलेजचे शिक्षक इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट तर्फे गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले शिक्षण क्षेत्रातील शिक्षकांचे भरीव योगदान, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेले परिश्रम आणि संस्थेप्रती दाखवलेली प्रामाणिकता या गोष्टींचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळा इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटच्या मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. या सोहळ्यात प्रतिभा ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक रघुनाथ ताम्हाणे, प्रा सुरेखा कुंभार, प्रा तृप्ती बजाज आणि वरिष्ठ लिपिक भूषण महाजन यांना स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या यशाबद्दल कॉलेजच्या प्राचार्या डॉ वनिता कुऱ्हाडे, संस्थेचे सचिव डॉ दीपक शहा, खजिनदार डॉ भूपाली शहा, संचालिका डॉ तेजल शहा तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व सन्मानित शिक्षकांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## "शाश्वत तंत्रज्ञानामुळेच भविष्यातील यंत्रणा सक्षम बनतील"

### शिक्षण विश्व: "सस्टेनेबिलिटी इन मेकॅनिकल इंजिनिअरिंग अँड डिझाईन"मध्ये तज्ज्ञांचा सुर

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**शाश्वत ऊर्जा, कार्यक्षम डिझाईन हे आधुनिक अभियांत्रिकीचे भविष्य ठरणार आहे. यामुळेच उद्योगविश्व अधिक पर्यावरणपूरक आणि कार्यक्षम होईल, असे मत विविध क्षेत्रातील तज्ज्ञांनी पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत व्यक्त केले.**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) येथे "सस्टेनेबिलिटी इन मेकॅनिकल इंजिनिअरिंग अँड डिझाईन" या विषयावरील पहिल्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते.

थर्मॅक्स लि.चे इनोव्हेशन विभागाचे मुख्य डॉ. आर. एस. झा यांनी "बॉयलर डिझाईनमधील नवे ट्रेंड्स" या विषयावर मार्गदर्शन केले. बॉयलरची कार्यक्षमता शंभर टक्क्यांपेक्षा जास्त कशी वाढविता येऊ शकते, एच टू ओ गणितीय मॉडेलिंग व थर्मल सिस्टीम्सच्या सिम्युलेशनचा उपयोग, तसेच कंडेन्सिंग टेक्नॉलॉजी, लो-एनवोक्स बर्नर्स, व्हीओक्स, मल्टिपल हीट एक्स्चेंजर्स, टर्ब्युलेटर्स आणि व्हेअरेबल-प्रायमरी पायपिंग यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाविषयी झा यांनी सविस्तर माहिती दिली.

द सॉल्ट सिस्टिम्सच्या संचालिका आदित्य माळिक यांनी "सस्टेनेबिलिटी" या विषयावर मार्गदर्शन केले. या परिषदेमुळे विद्यार्थ्यांना व उपस्थित तज्ज्ञांना ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञान, शाश्वत डिझाईन व पर्यावरणपूरक उपाययोजना याविषयीची माहिती मिळाली.

या परिषदेसाठी महाराष्ट्रासह विविध राज्यांमधून शंभर पेक्षा अधिक संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले. संशोधन पत्र सादरीकरण, तांत्रिक सत्रे व चर्चासत्रांच्या माध्यमातून शाश्वतता व डिझाईन क्षेत्रातील नवनवीन संकल्पना मांडण्यात आल्या.

यावेळी प्राचार्य डॉ. हरिश तिवारी, विविध विद्या शाखेचे अधिष्ठाता, मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागातील प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.







मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये शारदीय नवरात्रोत्सवाचा दुसरा दिवस साजरा करण्यात आला. नवरात्राची दुसरी माळ म्हणजे दुर्गा देवीचे द्वितीय स्वरुप ब्रह्मचारिणी देवीला समर्पित आहे. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी लाल रंगाचे कपडे परिधान केले होते. लाल रंग शक्ति, ऊर्जा आणि प्रेम याचा प्रतीक आहे हे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

# गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये नवरात्री उत्सव



गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये पारंपरिक व सांस्कृतिक उत्साहात नवरात्री उत्सव साजरा करण्यात आला. यात शिक्षकांनी स्त्रीशक्तीचे महत्व विविध उदाहरणांमधून विद्यार्थ्यांसमोर विशद केले. यावेळी संस्थेच्या संचालिका कविता भोंगाळे कडू पाटील उपस्थित होत्या.

Pune District Education Association's

# Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy

Saswad, Pune - 412301

D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your Application Now!



- Visit Us for Physical Scrutiny
- PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
- Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
- Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046